सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२

ठराव क्रमांक :- २१२

दिनांक :- २०/०६/२०२२

विषय क्रमांक :- ०१

मागील सर्वसाधारण सभा दि.१८/०४/२०२२ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.१८३ ते ठराव क्र.२११ हे सभागृहात वाचून दाखविणेत आले. सदर कार्यवृत्तातील ठराव क्र.१९६ मध्ये मानधन कर्मचारी श्री.मोहसीन इकबाल मुल्ला, श्री. स्वप्निल शशिकांत चव्हाण, श्री.रसुल मिटुसाब कटकेवाडी, श्री.भिमराव महादेव मांग, श्री.यासीन नुरखान पठाण, श्री.मोहमदशोहेब अलताफ पटेल यांचेही नावाचा समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे अशी दुरुस्तीसह सदरचे कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

तसेच, मा.महासभा दि.१८/०२/२०२२ ठराव क्र.१६६ अन्वये प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर करणेत यावा याऐवजी श्री नागराज सांस्कृतिक भवन ट्रस्ट ई-६४६ (सांगली) यांना देखभाल व दुरुस्तीसाठी देणेस ही सभा मान्यता देत आहे अशी दुरुस्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच दि.१८/०२/२०२२ व दि.१८/०४/२०२२ रोजीच्या महासभांमध्ये पारित झालेल्या सर्व विषयांना भारतीय जनता पार्टीच्या सभेस उपस्थित असलेले सर्व सन्मा.सदस्यांचा विरोध नोंदवून घेणेत येत आहे.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

D. P. Suryavoshi

महापौर,

महासभा विभाग

प्रशा.अधि.(आस्था)

मा.सभा व्यवस्थापक

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२

ठराव क्रमांक :- २१३

विषय क्रमांक :- ०२

दिनांक :- २०/०६/२०२२

दु:खवट्याचा ठराव

सांगली शहरातील खोजा कॉलनी, सह्याद्रीनगर येथील सामाजिक कार्यकर्ते श्री.अकबरअली रमजानअली भोजाणी यांच्या मातोश्री फिजाबानो रमजानअली भोजाणी यांचे वयाच्या ९१ व्या वर्षी दि.१६/०६/२०२२ रोजी वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खामध्ये ही सभा सहभागी होत असून, ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सदगती देवो अशी ही सभा ईश्वर चरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- श्री.संतोष शिवदास पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi

महापौर,

अनुमोदक :- सौ.रोहिणी सत्यजित पाटील

प्रेक्षणीय आहेवाले

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- २०/०६/२०२२

ठराव क्रमांक :- २१४

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

सांगली शहरातील बांधकाम व्यवसायिक व मराठा क्रांती मोर्चाचे आयोजक तसेच वेगवेगळ्या सामाजिक चळवळीमध्ये अग्रेसर असणारे पद्माळ गावचे सुपूत्र कै.रणजित (दादा)नागेशराव पाटील यांचे दि.०६/०६/२०२२ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने दु:खद निधन झाले. त्यांच्या निधनाने समाजाचे भरुन न येणारे नुकसान झाले आहे. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खामध्ये ही सभा सहभागी होत असून, ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सदगती देवो अशी ही सभा ईश्वर चरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- श्री.संतोष शिवदास पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- सौ.रोहिणी सत्यजित पाटील

महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२

ठराव क्रमांक :- २१५

विषय क्रमांक :- ०२

दिनांक :- २०/०६/२०२२

दु:खवट्याचा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.२ मधील सफाई कर्मचारी संदीप गजानन लोंढे यांचे अल्पश: आजाराने दि.०६ जून २०२२ रोजी दु:खद निधन झाले. त्यांची प्रकृती ठिक नसतानाही त्यांनी मनपाच्या सेवेत हजर राहून त्यांचे कर्तव्य चोक बजावलेले आहे. त्यांच्या या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खामध्ये ही सभा सहभागी होत असून, ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सदगती देवो अशी ही सभा ईश्वर चरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- श्री.वहिदा अय्याज नायकवडी

ठराव सर्वानुमते मंजुर

D/Suryavanshi

अनुमोदक :- श्री.बबिता संजय मेंढे

महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२

दिनांक :- २०/०६/२०२२

ठराव क्रमांक :- २१६

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांचा दर्जा उंचावण्याकरीता मा.महापौर व मा.आयुक्त यांनी विविध प्रोहोत्सानयुक्त कार्यक्रमांचे नियोजन करुन, महापालिका शाळांतील विद्यार्थ्यांचा पट वाढविणे तसेच या मध्ये प्रवेश घेणाऱ्या गोरगरिब नागरिकांच्या मुलांना गुणवत्ता पूर्ण शिक्षण मिळण्याकरीता, सामाजिक संस्थाशी सहकार्य करण्याचे धोरण अवलंबिले तसेच त्या सर्व मुलांना मोफत शैक्षणिक सोयी सुविधा पुरविण्याचा निर्णय घेतला. याबद्दल मा.महापौर व मा.आयुक्त यांचे सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.संजय नायकू मेंढे

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P.Suryakanshi

अनुमोदक :- श्री.उत्तम बाळकृष्ण साखळकर

महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- २०/०६/२०२२

ठराव क्रमांक :- २१७

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

मा.नितिनजी कापडनिस आयुक्त, सांगली यांना महानगरपालिका आयुक्त म्हणून तीन वर्षे पूर्ण झाली असून, त्यांनी या तीन वर्षात सांगली मिरज कुपवाड भागात जी केली त्यामुळे या शहरांचे सौंदर्य वाडविण्यासोबतच शहराच्या मुलभूत सुविधांचा,लहान मुलांपासून वृद्धांपर्यत विरंगुळ्याची साधने,गोरगरीब, मागासवर्गीय मुलांसाठी शिक्षणची उत्तम सोय, महापूर,कोरोना काळात आपत्ती आटोक्यात आणण्यासाठी जे प्रयत्न स्वत: फिल्डवर उतरुन केले त्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.योगेंद्र भगवान थोरात

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P.Suryavanshi

महापौर,

अनुमोदक :- श्री. शेडजी सुबराव मोहिते

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२

ठराव क्रमांक :- २१८

विषय क्रमांक :- ०२

दिनांक :- २०/०६/२०२२

अभिनंदनाचा ठराव

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा.अजितदादा पवार साहेब, नगरविकास मंत्री मा.एकनाथजी शिंदे साहेब व जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री तथा सांगली जिल्हाचे पालक मंत्री मा.जयंतरावजी पाटील साहेब यांनी सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या विकासासाठी १०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केलेबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.मैनुद्दीन शमशोद्दीन बागवान

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. शेडजी सुबराव मोहिते

D. P. Suryavanshi.
महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२

ठराव क्रमांक :- २१९

दिनांक :- २०/०६/२०२२

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

नुकत्याच पार पडलेल्या देशाच्या राज्यसभा सदस्य निवडणूकीत महाविकास आघाडीचे एकूण ३ जागांवर विजय प्राप्त केला त्यामध्ये शिवसेनेचे मा.श्री.संजयजी राऊत, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मा.श्री.प्रफुलजी पटेल व भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे मा.श्री.इम्रानजी प्रतापगडी यांची राज्यसभा सदस्य पदी निवड करणेत आली. त्यांच्या यशाबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.विष्णू आण्णासाहेब माने

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.मयुरेश बाबासाहेब पाटील

D/P Suryavanshi
महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२

ठराव क्रमांक :- २२०

विषय क्रमांक :- ०२

दिनांक :- २०/०६/२०२२

अभिनंदनाचा ठराव

भारतीय जनता पार्टीचे राज्यसभेचे उमेदवार मा.धनंजय महाडीक, मा.डॉ.अनिल बोंडे, मा.केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांची राज्यसभेवर खासदार म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल व हा विजय खेचून आणणेसाठी महाराष्ट्र विधान सभेचे विरोधी पक्षनेते मा.देवेंद्रजी फडणवीस साहेब व भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष मा.चंद्रकांतदादा पाटील यांचे मोलाचे योगदान मिळाल्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा नवनिर्वाचित खासदार यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.विनायक रमेश सिंहासने

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.शेखर मधुकर इनामदार

D.P. Suryavanshi

महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- २०/०६/२०२२

ठराव क्रमांक :- २२१

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

बिझनेस एक्सप्रेस श्री.फौंडेशन आणि आम्ही उद्योजिका आयोजित महिला उद्योजक राज्य परिषद २०२२ यांच्या वतीने महिला उद्योजक असलेल्या व नुतन उद्योजक यांना मार्गदर्शन केले जाते तसेच दरवर्षी संस्थेच्या वतीने या क्षेत्रात उत्कृष्ठ काम करणाऱ्या महिलांना पुरस्कारही देण्यात येतात.

सन २०२२ या वर्षी देण्यात येणारा संजिवनी पुरस्कार सौ.पुष्पलता बाबासाहेब पाटील माजी महिला व बालकल्याण सभापती यांना देण्यात आला. त्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- रोहिणी सत्यजीत पाटील ठराव सर्वानुमते मंजुर

D.P.Suryavanshi
महापौर,

अनुमोदक :- कांचन युवराज कांबळे

प्रभारी अधिकारी

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२

दिनांक :- २०/०६/२०२२

ठराव क्रमांक :- २२२

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

सांगलीची सुपूत्री कु.काजल सरगर हीने पंचकुला हरियाणा येथे पार पाडलेल्या खेलो इंडिया स्पर्धेमध्ये वेटलिफ्टींग खेळ प्रकारामध्ये ४० किलो वजनी गटात एकूण ११३ किलो वजन उचलून प्रथम क्रमांकावर राहून सुवर्ण पदक प्राप्त करुन महाराष्ट्र संघाला सुवर्ण पदकाचे खाते उघडून दिले. आपल्या या सुवर्णमय कामगिरीमुळे संपूर्ण सांगली जिल्ह्याचे राज्यभर नावलौकीक झाला आहे. आपल्या या यशाबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा आपले, कुटूंबियांचे व प्रशिक्षकांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.उमेश विलास पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

D P. Suryavanshi

महापौर,

अनुमोदक :- श्री.मनोज रघुनाथ सरगर

प्रशासनाधिकारी

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२

ठराव क्रमांक :- २२३ दिनांक :- २०/०६/२०२२

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

माझी वसुंधरा अभियान २.० अंतर्गत भूमी,जल,वायू,अग्नी व आकाश या निसर्गाचे संबंधित पंचतत्वावर आधारीत स्थानिक स्वराज्य संस्थांची स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धे अंतर्गत माझी वसुंधरा अभियानात अमृत गटामध्ये सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेने राज्यस्तरीय स्पधेत द्वितीय क्रमांक पटकविला आहे.

माझी वसुंधरा अभियानात अमृत गटामध्ये सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेने राज्यस्तरीय स्पधेत द्वितीय क्रमांक पटकविल्याबद्दल ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- ॲड.स्वाती नितिन शिंदे

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.रणजितसिंह संभाजीराव पाटील (सावर्डेकर)

D.P.Surywanshi
महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२

दिनांक :- २०/०६/२०२२

ठराव क्रमांक :- २२५

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेच्या अध्यक्षपदी मिरजेचे साहित्यीक व कवी श्री.भिमराव इश्वरा धुळूबुळू यांची एकमताने निवड केली. गेली २२ वर्षे ते या साहित्य सभेचे कार्यकारी सदस्य म्हणून कार्य करीत होते. या संस्थेची स्थापना १९८२ साली यशवंतराव चव्हाण यांनी केली. तसेच साहित्यीक व कवी श्री.नामदेव हरिबा भोसले यांची संस्थेच्या सदस्य पदी निवड झालेबद्दल सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.संजय नायकू मेंढे

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi

अनुमोदक :- श्री.उत्तम बाळकृष्ण साखळकर

महापौर,

महापालिका सचिव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२

ठराव क्रमांक :- २२५

दिनांक :- २०/०६/२०२२

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

सांगली शहरातील तरुणांच्या मनात छत्रपती शिवाजी महाराज यांचा पराक्रम व ध्येयवाद कायम तेवत राहावा यासाठी गुलाबराव पाटील चॅरीटेबल ट्रस्ट व सर्व शिवप्रेमी यांच्या मार्फत देशातील पहिली अखंड शिवज्योत प्रज्वलीत करण्यात आली. तमाम शिवप्रेमींचा अलोट जन सागरा समोर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्या जवळ ही अखंड तेवत राहणारी शिवज्योतीची स्थापना करण्यात आली. गुलाबराव पाटील चॅरीटेबल ट्रस्ट ने केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे. गुलाबराव पाटील चॅरीटेबल ट्रस्ट ने केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- ॲड.स्वाती नितीन शिंदे

ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavanshi

महापौर,

अनुमोदक :- सौ.सुनंदा चंद्रकांत राऊत

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२

ठराव क्रमांक :- २२६

दिनांक :- २०/०६/२०२२

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेकडून माझी वसुंधरा अभियान ३.० आणि स्वच्छ सर्व्हेक्षण २०२३ साठी ब्रँड ॲम्बेसिडर म्हणून निवडी करण्यात आली त्यामध्ये

१) जीवन विद्या मिशनचे मा.डॉ.दिलीप पटवर्धन व मा.माधवी पटर्वधन

२) शोले स्टाईल सामाजिक कार्यकर्ते मा.श्री.दिपक चव्हाण

३) आयुष्य सेवाभावी संस्थेच्या मा.संपदा पाटील

४) महिला क्रिकेट पटू मा.स्मृती मानधना

५) प्रसिद्ध सिनेकलाकार मा.उमाकांत पाटील

६) प्रसिद्ध हास्य कलाकार मा.अजितकुमार कोष्टी

७) पोदार इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल

८) आप्पासाहेब बिरनाळे पब्लीक स्कूल

या सर्वांचे माझी वसुंधरा अभियान ३.० आणि स्वच्छ सर्व्हेक्षण २०२३ साठी बँड ॲम्बेसिडर म्हणून निवड झालेबद्दल सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- ॲड.स्वाती नितीन शिंदे

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi
महापौर,

नअनुमोदक :- श्री.रणजितसिंह पाटील (सावर्डेकर)

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- २०/०६/२०२२

ठराव क्रमांक :- २२७

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

एशियन टेनिस फेडरेशतर्फे इंग्लंड येथे होणाऱ्या विम्बल्डन स्पर्धेसाठी कोल्हापूरची टेनिसपटू ऐश्वर्या जाधव हीची आशियाई संघात निवड झाली आहे. या स्पर्धेसाठी निवड झालेली ती देशातील एकमेव खेळाडू आहे. तीची दिल्ली येथे झालेल्या वर्ल्ड ज्युनिअर टेनिस स्पधेतून या संघाची निवड करणेत आली. त्याबद्दल सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- ॲड.स्वाती नितीन शिंदे

ठराव सर्वानुमते मंजुर

D/Surjavyh

नअनुमोदक :- श्री.रणजितसिंह पाटील (सावर्डेकर

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- २०/०६/२०२२

ठराव क्रमांक :- २२८

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

आफ्रिका खंडातील सर्वात उंच शिखर असणारे किलीमांजारो (१९३४० फुट) दि.१४ जून २०२२ रोजी सकाळी ९.१० वा. सांगलीचे श्री.अभयकुमार पंडीतराव मोरे यांनी वयाच्या ५८ व्या वर्षी यशस्वीरित्या सर केले. सांगली शहराच्या वॉर्ड क्र.९ मधील न्यु अजिंक्य पार्क कॉलनी मधील ते रहिवाशी आहेत. त्यांच्या कामगिरी बद्दल सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.संतोष शिवदास पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavanshi.

महापौर,

नअनुमोदक :- सौ.रोहिणी सत्यजीत पाटील

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- २०/०६/२०२२

ठराव क्रमांक :- २२९

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (प्रशा.विभाग) यांचे दि.२३/०५/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये समाजात प्रचलित असलेली अनिष्ट विधवा प्रथा बंद करणेसाठी धोरणात्मक निर्णयार्थआलेल्या प्रस्तावावर ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

समाजात प्रचलित असलेल्या अनिष्ठ विधवा प्रथा बंद करणे आवश्यक आहे. आज प्रगतशील समाज म्हणून आपण वाटचाल करीत असलो तरी पतीच्या निधनावेळी पत्नीचे कुंकू पुसणे, हातातील बांगड्या काढणे, पायातील जोडवी काढणे अशा प्रथांचे समाजात पालन केले जाते व पतीचे निधनानंतर पत्नीला विधवा म्हणून तीची अवहेलना केली जाते. तसेच विधवा महिलांना समाजात कोणत्याही धार्मिक व सामाजिक कार्यक्रमात सहभागी होवू दिले जात नाही या कुप्रथांमुळे व्यक्तीच्या प्रतिष्ठेने जीवन जगणेच्या मानवी अधिकाराचे तसेच संविधानांने बहाल केलेल्या समतेच्या हक्काचे उल्लंघन होते. त्यामुळे सदरच्या कुप्रथा तात्काळ बंद झाल्या पाहिजेत असे या सभेचे मत असून, विधवा प्रथा बंद होणेसाठी प्रशासनाने समाजामध्ये व्यापक जनजागृती व लोक प्रबोधन मोहिम राबवावी असे ही सभा सूचित करीत आहे.

तसेच, ही सभा प्रशासनास आदेशित करते की, विधवा झाल्यांनतर सुद्धा ज्या विधवा महिलांनी आपला संसार उभा केला अशा विधवा महिलांचा महापालिकेच्या वतीने गौरव करावा. त्याच बरोबर अशा महिलांसाठी वेगवेगळ्या योजना महापालिकेच्या वतीने राबविणेत याव्यात. विधवा महिलांचे बचत गट स्थापन करावेत त्यांना वेगवेगळे प्रशिक्षण देवून, त्यांना उद्योग- व्यवसाय उपलब्ध करुन देणेसाठी सहाय्य व आर्थिक मदत करावी. तसेच, विधवा महिलांना शुभ कार्यामध्ये, हळदी-कुंकू कार्यक्रमात बोलाविणेत यावेत यासाठी जनजागृती करावी. विधवा महिलांचे मेळावे घेवून त्यांचे समुपदेशन करणेत यावे. त्यांचे हस्ते विकास कामांचे उद्घाटने घ्यावीत. जेणे करुन त्यांना समाजामध्ये मानसन्मान मिळेल. विधवा प्रथा बंद करणेसाठी महापालिका क्षेत्रात जनजागृती रॅली व प्रबोधनात्मक चित्ररथाचे आयोजन करावे. महापालिका क्षेत्रामध्ये विधवा अनिष्ठ विधवा प्रथा बंद करणेसाठी हेल्पलाईन सुरु करावी. त्याच बरोबर महापालिकेच्या स्मशानभूमी मध्ये विधवा प्रथा बंद करणेबाबत प्रशासनाने जनजागृतीपर फलक लावावेत. ज्या विधवा महिलांना शिक्षणासाठी लागणारी शैक्षणिक फी आर्थिक परिस्थितीमुळे भरता येत नाही अशा विधवा महिलांचा शैक्षणिक फी महापालिकेच्या वतीने भरणेत यावी त्यास ही सभा मान्यता देत आहे.

प्रशासकीय अधिकारी

सूचक :- श्री.विष्णू माने

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अनुमोदक :- श्री.सोडजी मोहिते

ठराव सर्वानुमते मंजुर

D/Suryavanshi

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- २०/०६/२०२२

ठराव क्रमांक :- २३०

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०९/०६/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिके मधील कार्यरत कंत्राटी कनिष्ठ अभियंता यांना सार्वजनिक बांधकाम विभागातील चालू / झालेल्या कामांचे मोजमाप पुस्तिकेत मोजमाप नोंदविणेस अधिकार प्रदान करणेस धोरणात्मक निर्णयार्थ आलेल्या प्रस्तावावर ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिकेच्या बांधकाम विभागाकडे सहा कनिष्ठ अभियंता कार्यरत आहेत. सदरचे कंत्राटी अभियंता हे बी.ई.सिव्हील पदवीधर असून, त्यांना बांधकाम क्षेत्रातील ४ ते ५ वर्षाचा अनुभव आहे. बांधकाम विभागाकडील कामाची व्याप्ती पाहता व कायमस्वरुपी शाखा अभियंता,कनिष्ठ अभियंता यांची अपुरी संख्या असल्याने, कंत्राटी अभियंता यांना प्रगतीतील/ पुर्ण झालेल्या कामाचे मोजमाप पुस्तिकेत मोजमाप नोंदणीचे र.रु.१० लक्ष पर्यतच्या मर्यादेचे अधिकार देणेस ही सभा मान्यता देत आहे.

कनिष्ठ अभियंता मानधन कंत्राटी यांना मोजमाप पुस्तिकेत नोंदविणेचा अधिकार देणेपूर्वी प्रशासनाने विहित शर्ती-अटी निश्चित करुन, त्यानुसार कंत्राटी अभियंता यांचेकडून Indemnity bond करुन घेणेत यावा. कंत्राटी कर्मचारी यांनी मोजमाप लिहिल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या म्यॅनुअल प्रमाणे त्याची १००% तपासणी नगर अभियंता/शाखाअभियंता यांनी नियमानुसार करणे बंधनकारक राहील व त्याबाबतचे संपूर्ण नियंत्रणाची जबाबदारी खाते प्रमुख शहर अभियंता यांचेवर राहील असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री.विनायक सिंहासने

महापालिका सचिव
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.संजय मेंढे

D.M.Suryavanshi
महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- २०/०६/२०२२

ठराव क्रमांक :- २३१

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.२५/०५/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महापालिका क्षेत्रात कोविड-१९ या साथीच्या आजाराने मयत झालेल्या व्यक्तींच्या बालकांना शालेय मदत,एकल महिलांची आर्थिक उन्नती होण्यासाठी बचत गट स्थापन करणे,उदरनिर्वाह भत्ता देणे व मनपाच्या विविध विभागामध्ये कामे राखीव ठेवणेकामी धोरणात्मक निर्णयार्थ आलेल्या प्रस्तावावर ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

कोविड कालावधी मध्ये कोविड साथीच्या आजाराने मयत झालेल्या व्यक्तींच्या एकल झालेल्या महिलांना तसेच, कोविड मुळे दोन्ही पालक गमावलेले बालक यांना मदत करणेबाबत मा.शासन निणर्य क्र.एमयुएम-२०२०-२१/प्र.क्र.३८५/नवि.१७ दि.२९/०३/२०२२ चे शासन निर्णयान्वये मदत करणेबाबत कळविणेत आलेले आहे. महापालिका क्षेत्रात कोविड १९ मुळे एक ल झालेल्या महिलांची संख्या ९८ असून दोन्ही पालक गमावलेल्या बालक यांची संख्या १० आहे.

कोविड १९ मुळे एकल झालेल्या महिलांना दरमहा रु.२०००/- निर्वाह भत्ता व कोविड १९ मुळे दोन्ही पालक गमावलेल्या बालकांना त्यांच्या वयाच्या १८ वर्षापर्यत दरमहा रु.१०००/- मात्रचे अनुदान तसेच, बालकांना मनपा शाळेत मोफत प्रवेश,मोफत गणवेश व शैक्षणिक साहित्य देणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, उपरोक्त प्रशासनाने प्रस्तावित केलेल्या लाभार्थ्या व्यतिरिक्त राहिलेल्या कोविड १९ मुळे एकल झालेल्या महिला व दोन्ही पालक गमावलेले बालक यांचा समावेश होणेसाठी प्रशासनाने लेखी अर्ज मागवून, छाननी करुन त्यांचाही समावेश करणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी मधून होणेचा आहे.

तसेच, महापालिकेचे मानधन,बदली,रोजंदारी,कंत्राटी कर्मचारी कोव्हीड मध्ये मयत झालेले असतील त्यांचे वारसास मानधन/कंत्राटी तत्वावर महापालिका सेवेत सामावून घेणेत यावे. त्याच बरोबर लाड/पागे शिफारशीनुसार नोकरी मिळणेसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांबाबत काही तांत्रिक अडचणीमुळे नियुक्ती देता येत नसेल अश उमेदवारांना खास बाब म्हणून मानधनावर सेवेत घेणेस ही सभा मान्यता देत आहे.

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सूचक :- श्री. संजय मेंढे

अनुमोदक :- श्री. शेडजी मोहिते

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Surjavanshi

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- २०/०६/२०२२

ठराव क्रमांक :- २३२

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (शनादानिक) यांचे दि.१०/०६/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली जिल्हा निवारा संघ व इतर यांनी बेघरांना राहणेसाठी वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेत लाभ मिळावा अशी मागणी केलेली आहे. सांगली जिल्हा निवारा संघ व इतर यांनी यासाठी १८५ अर्ज महापालिकेकडे सादर केलेले आहेत. तसेच गृहनिर्माण संस्था अंतर्गत १७२ लाभार्थ्यांचे अर्ज असे एकूण ३५७ अर्ज दाखल झालेले आहेत. त्यामध्ये शासन निकषाप्रमाणे कोर्ट यादी प्रमाणे ९८ लाभार्थी पात्र आहेत व गृहनिर्माण यादी प्रमाणे ४१ लाभार्थी असे एकूण १३९ लाभार्थी निकष पूर्ण केलेने महासभा ठराव क्र.४१ दि.१८/०९/२०२० अन्वये वाल्मिकी आवास योजनेचा लाभ देणेत आलेले आहेत. तसेच २००५,२०१९ व २०२१ मध्ये आलेल्या महापुरामुळे उपरोक्त ३५७ लाभार्थ्यांपैकी काही लाभार्थ्यांचे घरात पुराचे पाणी शिरल्याने त्यांची कागदपत्रे नष्ट झाल्याने ते घरकुलाच्या लाभापासून वंचित आहेत.

वाल्मिकी आंबेडकर आवास योजना,जुना बुधगाव रोड,सांगली येथे १५३६ घरकुले बांधण्यात आली असून, त्यामधील १०७८ लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देणेत आलेला आहे. उर्वरित ४५८ घरकुले शिल्लक आहेत. सदर शिल्लक असलेल्या घरकुलाकरीता जिल्हा निवारा संघ व इतर यांनी आजअखेर ३५७ अर्ज केलेले आहेत. त्यापैकी १३९ लाभार्थ्यांना यापुर्वी लाभ दिलेला आहे. उर्वरित २१८ लाभार्थ्यांचे उपलब्ध असलेले पुरावे घेवून, २१८ लाभार्थ्यांना वाल्मिकी आंबेड़कर आवास योजना,जुना बुधगाव रोड,सांगली येथे घरकुलाचा लाभ देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- S. K. Patil श्री. संजय मेंढे ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- S. Bhosale श्री. शेखर शिंदे D.P. Suryavanshi महापौर,

उपायुक्त (शनादानिक)

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- २०/०६/२०२२

ठराव क्रमांक :- २३३

विषय क्रमांक :- ०८

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.११/०४/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महापालिका क्षेत्रातील दैनंदिन कचरा संकलन करणे व त्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावणेसाठी घरकचरा व्यवस्थापन नियम २०१६ नुसार कार्यवाही ठेवणेत येत आहे. त्यास अनुसरुन महापालिकेने राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण पुणे यांचे आदेशाने घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ नुसार आवश्यक असणारी वाहनांची खरेदी केलेली आहे. तसेच याव्यतिरिक्त भविष्यात आणखी वाहने खरेदी करणेची प्रक्रिया प्रस्तावित आहे. घरोघरी फिरती करुन कचरा संकलन करणेसाठी वापरणेत येणारी वाहनांकरीता वाहन इंधन वंगण हे प्रभाग समिती निहाय लेखाशिर्षातून खर्ची करणेत येत आहेत. सदरची इंधन वंगण देयके ही मुख्य लेखाधिकारी यांनी शासन निर्णय क्र.टीएफसी-८०१५/प्र.क्र.१०६/नवि १४ दि.०३ ऑगस्ट २०१५ रोजीच्या शासन निर्णयामधील (III) (२) नुसार महासभेच्या मान्यतेने १४ व्या वित्त आयोगा निधीतून खर्ची टाकणेबाबत सुचित केलेनुसार सदरची घनकचरा वाहतुकीकरीता लागणारे इंधन-वंगण यांची देयके १४ व्या वित्त आयोगामधील ई-१२१३-१४ वा वित्त आयोग अखर्चित रक्कम या लेखाशिर्षातील निधीतून खर्ची टाकणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयासच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.शेडजी सुबराव मोहिते यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मिरज येथील भारतनगर,काळीखणीचा अमृत २.० योजनेतून मा.शासनाने जल साठ्याचे पुर्नजीवन करणेसाठी प्रस्ताव सादर करणेच्या सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार महापालिका क्षेत्रातील मिरज भारतनगर येथील काळी खण जलसाठ्याचे पुर्नजीवन करण्यासाठीचा प्रस्ताव सादर करणेसाठी महापालिका आर्किटेक्ट पॅनेल वरील आर्किटेक्ट प्रमोद चौगुले यांची आर्किटेक्ट म्हणून नियुक्ती करणेस व सदरचा प्रस्ताव मा.शासनाकडे प्रशासकीय मान्यता व निधी मिळणेसाठी सादर करणेस तसेच, यासाठी आवश्यक सर्व अटींची पुर्तता करणेस व मनपा स्वहिस्सा भरणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.मैनुद्दीन बागवान. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.शेडजी मोहिते

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- २०/०६/२०२२

ठराव क्रमांक :- २३४

विषय क्रमांक :- ०९

सोबतचे उपायुक्त (प्र.स.क्र.३) यांचे दि.१०/०६/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड येथील स.नं.१२४ व १२५ मधील जमिनीपैकी सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीस १ हेक्टर (१०० मी. X १०० मी.) जागा देणेत आलेली आहे. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीस वाटप झालेल्या मिळकतीस सांगली मिरज रस्त्यापासून पोहोच रस्ता उपलब्ध होणेकरीता नियोजीत ४५.०० मी. रुंद रस्त्याने व पब्लिक, सेमीपब्लिक या आरक्षणाने बाधीत खाजगी मालकीच्या मिळकतीचे क्षेत्र भूसंपादन करणे आवश्यक आहे.

सदर खाजगी मिळकतीचा जुना स.नं.१२३/क/२ब व १२३/क/२/अ/१ त्यास सि.स.नं.४४९०,४४९१,४४९२ व ४४९३ असे देण्यात आलेले आहेत. त्या मिळकती श्री.रामचंद्र देवाप्पा बनसोडे,श्री.मिराजी देवाप्पा बनसोडे,श्री.दत्तात्रय देवाप्पा बनसोडे,श्री.यशवंत देवाप्पा बनसोडे यांनी दि.२०/०२/१९६१ रोजीच्या नोंद खरेदी दस्त क्र.१७२ अन्वये दि.महराष्ट्र टेक्निकल सो.तर्फे सेक्रेटरी यांचेकडून खरेदी केलेली आहे. सदर मिळकतीचे एकूण क्षेत्र १९९२.०० चौ.मी.असून त्यापैकी मनपाच्या मंजूर विकास योजनेनुसार नियोजित मिरज सांगली ४५.७० मी. रस्ता रुंदीने व पब्लिक,सेमीपब्लिक झोनने बाधीत होणारे क्षेत्र अनुक्रमे ८३४.०० चौ.मी. व ६५१.०० चौ.मी. असे एकूण १४८५.०० चौ.मी. क्षेत्र भूसंपादन करणे आवश्यक आहे. सदर भुसंपादन करावयाच्या क्षेत्रामध्ये प्रत्यक्ष जागेवर मिळकत धारकांनी पक्क्या स्वरुपाची लोडबेअरींग व आर.सी.सी.च्या निवासी व वाणिज्य इमारती असून त्याचा वापर सुरु आहे.

सदर भूसंपादन करावयाच्या क्षेत्रास श्री.भास्कर यशवंत बनसोडे श्री.रामचंद्र बनसोडे, श्री.प्रविण लक्ष्मण बनसोडे,श्री.प्रमोद लक्ष्मण बनसोडे,श्री.अनंत मिराजी बनसोडे,श्री.प्रकाश यशवंत बनसोडे यांनी महानगरपालिकेकडून योग्य ती कायदेशीर नुकसान भरपाई घेवून सदरची जागा महानगरपालिकेच्या ताब्यात देणेची तयारी दर्शविलेली आहे. तसेच सदर मिळकतीचे दि.११/०५/२०१८ रोजीचे वाटणीपत्र सादर केले आहे. सदरची जागा महानगरपालिका खरेदी करुन घेणार असलेमुळे या जागेबाबत कोणाची काही हरकत किंवा सूचना असलेस ती सदरची सूचना प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांत सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेकडे लेखी स्वरुपात कळविणेकामी दि.२६/०१/२०२१ रोजीच्या दैनिक वृत्तपत्रामध्ये जाहिर सूचना प्रसिद्ध करणेत आली होती.

सदर जाहिर सूचनेनुसार सौ.अरुणा प्रल्हाद कांबळे रा.वानलेसवाडी यांनी ॲड.संतोष अशोक साळूंखे यांचे मार्फत दि.०४/०२/२०२१ रोजी उत्तरी नोटीस वजा हरकत नोटीस महानगरपालिकेस देणेत आलेली होती. सदर हरकतीच्या अनुषंगाने मनपा मुख्य कायदे सल्लागार यांनी दि.३०/०४/२०२१ रोजीच्या पत्रान्वये सदर खाजगी क्षेत्र संपादन करण्यास कायदेशीर अडचण नसलेबाबत अभिप्राय दिलेला आहे.

सदर रस्त्याखालील ८३४.०० चौ.मी.व, सेमी पब्लिक झोन मधील ६५१.०० चौ.मी.असे एकूण १४८५.०० चौ.मी.क्षेत्र महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम कलम १२६ पोटकलम ४ सह भूमिसंपादन अधिनियम, पुनर्वसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याच्या व पारदर्शकता अधिनियम २०१३ अन्वये जिल्हाधिकारी,सांगली कार्यालयामार्फत भूसंपादन करणेस व भूसंपादन प्रक्रियेत निश्चित होणारे मुल्य आदा करणेस किंवा महानगरपालिका स्तरावर खाजगी वाटाघाटीने / अन्य विहित पद्धतीने भूसंपादन करणेस व त्यांचे होणारे मुल्य आदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. विष्णू माने

अनुमोदक :- श्री. रोडजी मोहिते

ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavanshi

महापौर,

स.स.न.र.

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका